MHGO060001632026

## एम. जे. सी. क्र. ०३/२०२६ चे निशाणी क्र. १ खालील आदेश

## रामु – वि.– निरंक

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कलम ३ व ७ बॉम्बे रेग्युलेशन कायद्यानुसार दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जदार हे मयताचे वडील असून मयत संचित रामु बोरकर यांचा मृत्यु दिनांक १६.१२.२०२५ रोजी झाला आहे. मृतक संचित रामु बोरकर हे अविवाहीत मृत्यु पावले. अर्जदाराची पत्नी व मृतक संचित रामु बोरकर यांची आई नामे रंजना रामु बोरकर ही दिनांक २९.०५.२०२३ ला मृत पावली आहे. मयत संचित रामु बोरकर हे मौजे सिंगलटोली, ता. अर्जुनी/मोरगांव, जि. गोंदिया येथील रहीवासी होते. अर्जदार असे कथन करतात की, त्यांना अर्जदाराव्यतिरीक्त ईतर कुठलेही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार हेच मयत संचित रामु बोरकर यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारास शासकीय, निमशासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. करिता अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

३. अर्जदाराने वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन काढून हरकत मागविण्यात आली. सदरचे जाहीर प्रगटन हे दिनांक ०७.०२.२०२६ रोजीच्या 'नवराष्ट्र गोंदिया' आवृत्तीमध्ये प्रसिध्द करण्यात आले परंतु ३० दिवसांच्या कालावधीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर आणि विना आक्षेप चालविण्यात आले आहे.

४. अर्जदार याने त्याचे अर्जाचे पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १३ दाखल केले. त्याने त्याच्या सरतपासात त्याच्या अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदाराने कागदोपत्री पुराव्यामध्ये मयत संचित रामु बोरकर व रंजना रामु बोरकर यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेले प्रत नि. क्र. १४ व १५, अध्यक्ष नगरपंचायत अर्जुनी/मोरगांव यांनी दिलेले वारसान प्रमाणपत्र नि. क्र. १६, अर्जदार यांच्या आधारकार्डाची पडताळणी केलेली प्रत नि. क्र. १७ वर, तसेच दिनांक ०७.०२.२०२६ रोजीचे 'नवराष्ट्र गोंदिया' मध्ये प्रसिध्द झालेले जाहीर प्रगटन निशाणी क्र. १८

वर दाखल केलेले आहे. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदाराचा पुरावा व प्रस्तुत दस्ताऐवज विना उजर व आक्षेपविना राहीले आहे.

५. अर्जदाराने पुरावा बंद केल्याबाबतची पुरसिस निशाणी क्र. १९ वर दाखल केली आहे. संपुर्ण दस्ताऐवजांचे अवलोकन केले असता व वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता, अर्जदार हेच मयत संचित रामु बोरकर यांचे वारस असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. करिता खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. अर्जदार श्री रामू सदाशिव बोरकर, रा. सिंगलटोली, ता. अर्जुनी/मोरगांव, जि.गोंदिया हे मयत संचित रामु बोरकर यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.03.16 16:41:03 +0530

(श्रीमती एन. व्ही. साहु)
दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,
अर्जुनी/मोरगांव

दिनांकः–१६.०३.२०२६